गडचिरोली
# महासागर जिल्हा विशेष
शुकवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ ३

## अवयव दान मोहीमेत सहभागी होण्याचे आवाहन

**कूरखेडाः** गैरसमज न ठेवता मानवतावादी दृष्टिकोणातून गरजूना नवजिवन देण्याकरीता व मरणोपरांत सूध्दा या जगात आपले अस्तित्व कायम ठेवण्याकरीता अंगदान जीवन संजीवनी अभियानात आपली नोंदणी करीत या चळवळीत सहभागी व्हा असे आवाहन उपजिल्हा रूग्णालय कूरखेडा येथे अवयव दान जनजागृति पंधरवाडा निमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शनातून मान्यवरानी केले.

अवयव दान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून ती मानूसकीचा सर्वोच्च सन्मान आहे एका ब्रेन डेड व्यक्तीचा अवयवा द्वारे ७ रूग्नाना नवे जिवन मिळू शकते यकृत, मूत्रपिंड, ह्दय, फुफ्फुसे, स्वादूपिंड तसेच डोळे यांचे दान करीत मरनोपरांत आपण अवयवाचा प्रतिक्षेत असलेल्या हजारो रूग्नाना नवजिवन देत पूण्यकर्मात सहभागी होऊ शकता असे आवाहन उपस्थीताना करण्यात आले. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधिक्षक डॉ. अमीत ठमके, प्रमुख अतिथि रूग्न कल्याण समीतीचे सदस्य सिराज पठान, भाजपा तालुकाध्यक्ष चांगदेव फाये, डॉ. नितीन कटरे, विवेक निरंकारी, चेतन गहाणे, प्रा विनोद नागपूरकर उपस्थित होते.

# रानभाज्यांना राजश्रय देवून गडचिरोली ब्रँड निर्माण करण्याची गरज

### कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल : जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १४ :** रानभाज्यांची खरी मजा गडचिरोलीत असून त्यांची मौलिकता नष्ट होऊ नये यासाठी त्यांना राजश्रय देणे गरजेचे आहे, असे मत कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी व्यक्त केले. यासोबतच त्यांनी गडचिरोलीसारखा मोठा ब्रँड राज्यात नसल्याचे सांगत या जिल्ह्यातील वनउपज विक्रीसाठी 'गडचिरोली' या नावाने स्वतंत्र ब्रँड निर्माण करण्याचे आवाहन केले.

सोनपूर (गडचिरोली )येथील आत्मा कार्यालयाच्या आवारात गुरूवार १४ ऑगस्ट रोजी आयोजित जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवात बोलत होते. यावेळी



आमदार डॉ. मिलिंद नरोटे, आत्मा प्रकल्प संचालिका व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रीती हिरळकर उपस्थित होते.तत्पूर्वी आज सकाळी जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा व खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या उपस्थितीत रानभाजी महोत्सवाची सुरुवात करण्यात आली.

निसर्गाने दिलेल्या रानभाज्या चवीला समृद्ध आणि आरोग्यास हितकारक आहेत. आजच्या तरुणाईपर्यंत या रानभाज्यांचे ज्ञान आणि आरोग्यमूल्य पोहचविले पाहिजे, असे राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले. जूनी चव आणि नवी पिढी यांचे नाते मजबूत व्हावे यासाठी महिला बचतगटांनी पुढाकार घेतल्यास, 'उमेद' मार्फत त्यांना चालना देण्यात येईल. शेतकरी आणि ग्राहक यांचा थेट संपर्क जुळवण्यासाठी जिल्ह्यात 'उमेद मॉल' उभारण्याचे नियोजन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

आयोजित रानभाजी महोत्सवात तांबडी भाजी, चाकवत, माठ, शेवगा पानं, तिळवणी, कदुरले, वासे यांसारख्या अनेक रानभाज्या या महोत्सवात विक्रीसाठी ठेवल्या होत्या. यावेळी कृषी उपसंचालक मधुमिता जुमले, कृषी विकास अधिकारी किरण खोमणे, आत्माच्या समन्वयक अर्चना कोचरे तसेच ग्रामीण भागातील विविध बचतगटाच्या महिला व नागरिक उपस्थित होते.

## एटापल्लीत दारूविक्री विरोधात मोहीम

गडचिरोलीः एटापल्ली शहर संपूर्ण दारूविक्रीमुक्त करण्यासाठी एटापल्ली पोलिसांकडून निरंतर मो. हीम राबविली जात आहे. नुकतेच विविध वार्डमध्ये मुक्तिपथ चमू व पो. लिस विभागाने संयुक्तरीत्या कारवाई करीत दोन ठिकाणी मिळून आलेला मोहफुलाचा सडवा नष्ट करीत पुन्हा दारूविक्री करताना आढळून आल्यास गुन्हा नोंद करण्याचा इशारा देण्यात आला.

पोलिस निरीक्षक मच्छिंद्र नागरगोजे यांचे मार्गदर्शनात एटापल्ली शहरात सातत्याने धडक मोहीम राबविण्यात येत आहे. एटापल्ली येथील वार्ड क्र.७, ८, १२, १३, १४ इंदिरा वार्ड येथील ११ ठिकाणी धाडी टाकण्यात आल्यात. पोलिसांच्या भीतीपोटी ९विक्रेत्यांनी अवैध व्यवसाय बंद केल्याचे दिसून आले. तसेच दोन ठिकाणी गावठी दारू लपून विक्री करत असल्याचे आढळून आल्याने दारूसाठा नष्ट करून तंबी देण्यात आली.

## सात पोलिस अधिकारी, अंमलदारांना राष्ट्रपती पोलिस शौय पदक जाहीर

### हेमलकसा-कारमपल्ली चकमकीतील धाडसी कामगिरीची दखल



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १४ :** जिल्ह्याच्या अतिदुर्गम भागात कार्यरत असलेल्या पोलीस दलातील सात धाडसी जवानांची पोलीस शौर्य पदकासाठी निवड झाली असून, स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपतींकडून हे पदक जाहीर करण्यात आले आहे. हे पदक राज्यातील केवळ गडचिरोली पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांना मिळाले असून, हे संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

या वर्षी सन २०२५ मध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी सुखदेव बंडगर, सफौ.मनोहर कोतला महाका, चापोहवा मनोहर लचमा पेंदाम, पोशि प्रकाश ईश्वर कन्नाके, पोशि अतुल सत्यनारायण येगोलपवार, पोशि हिदायत सदुल्ला खान, शहीद पोशि सुरेश लिंगाजी तेलामी (मरणोत्तर) यांचा समावेश आहे.

ही सन्मानाची घोषणा हेमल. कसा-कारमपल्ली रस्त्यावर २०१७ साली झालेल्या माओवादी चकमकीतील शौर्याच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली आहे. त्या वेळी सी-६० पथक भामरागडला एमपीव्ही (माईन प्रोटेक्टेड व्हेईकल) वाहनांद्वारे परत येत असताना, माओवाद्यांनी भूसुरुंग स्फोट घडवून पथकावर भ्याड हल्ला केला होता. या गंभीर प्रसंगी संबंधित जवानांनी अफाट धैर्य, प्रसंगावधान व कर्तव्यनिष्ठा दाखवून माओवाद्यांचा समर्थपणे मुकाबला केला. त्यांनी स्वत:सह इतर जखमी जवानांचे प्राण वाचवत माओवाद्यांच्या गोळीबाराला समर्थ प्रत्युत्तर दिले. या कार्याची दखल घेत केंद्र सरक. ारने या सात वीरांना राष्ट्रपती पोलीस शौर्य पदकाने गौरवले आहे. या निवडीबद्दल गडचिरोली जिल्हा पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी सर्व पदकप्राप्त अधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांचे मनोबल वाढवले आहे, तसेच त्यांना पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

सात पोलिस अधिकारी, अंमलदारांना राष्ट्रपती पोलिस शौर्य जाहीर झाल्याने गडचिरोली पोलीस दलासाठी ही मोठी सन्मानाची बाब असून, गेल्या पाच वर्षांत या दलाला ३ शौर्यचक्र, २१० पोलीस शौर्य पदके व ८ गुणवत्तापदके मिळाले आहेत. अशा या वीरांची कामगिरी संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## 'हर घर तिरंगा' रॅलीने आरमोरीकरांचे वेधले लक्ष

### महान व्यक्ती वेशभूषा साकारून विद्यार्थ्यांनी केले मंत्रमुग्ध

**शहर प्रतिनिधी**
**आरमोरी दि. १४ :** 'हर घर तिरंगा अभियानांतर्गत आरमोरी येथील पॅराडाइज स्कूल आरमोरीच्या वतीने हर घर तिरंगा रॅलीचे लेझीम आणि थाळ्याच्या गजरात आयोजन करण्यात आले. ह्या रॅलीचे वैशिष्ट्या चिमुकल्याने रंग. वलेला संताचा मळा ज्यात संत ज्ञानेश्वर माऊली (प्रयाग बेहेरे ), मुक्ताबाई (स्वरा बेहेरे), बहिणाबाई (तिथी धाडुरकर), जनाबाई (सिद्धी हेमके), विठ्ठल रुक्मिणी (वंश निंबे. कर,गार्गी निंबेकर), संत तुकाराम तसेच संस्कृती मडावी, आराध्या इत्यादी तसेच भारत देशाचा अभिमान तिरंगा राष्ट्रध्वज व संविधानाचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी विविध महान व्यक्तींची वेशभूषा साक. ारली. दक्ष आकरे (महात्मा गांधी), पारस भोयर (शिवाजी महाराज), श्रेयस लांडगे (बिरसा मुंडा), विराग( इंदिरा गांधी), तशविका कवंडर



अभय चिचघरे (भगतसिंग) हेमंत देविकार (भगतसिंग) यांनी आरमो. ारीकराचे लक्ष वेधले.

या यात्रेचा शुभारंभ पॅराडाइज इंग्लिश मीडियम स्कूल येथून संस्थाध्यक्ष गोविंद राजन कवंडर व विभाग प्रमुख विजयलक्ष्मी कवंडर, मुख्याध्यापक केशवंत कवंडर यांच्याद्वारे हिरवी झेंडी दाखवून आरंभ करण्यात आली. या रॅलीला यशस्वी करण्यासाठी व रस्त्याने मुलांची हैळ सांड होऊ नये म्हणून संपूर्ण पोलीस यंत्रणा आरमोरी येथील कर्मचाऱ्यांनी खूप मोलाचे योगदान दिले. सदर रॅली जुना बस स्टॉप ते नवीन बस स्टॉप होऊन पंचायत समिती आरमोरी कार्यालयात नेण्यात आली. तेथे सर्व मुलांनी एकत्र होऊन डायटचे कार्यकारी प्राचार्य धनंजय चापले, गटशिक्षणाधिकारी मंगेश आरेवार, बाल विकास प्रकल्प अधिकारी मनोज मडावी, सहायक गटविकास अधिकारी अशोक कुर्जेकर, गटशिक्षणाधिकारी दीपक देवतळे, शिक्षण विस्तार अधिकारी राजेश वडपल्लीवार यांच्या उपस्थितीत पंचायत समितीच्या पटांगणात ध्वजारोहण करून पसायदान व महाराष्ट्र गीत गाऊन या रॅलीची सांगता करण्यात आली.

## डेंग्युने घेतला आष्टी येथील व्यवसायिकाचा बळी

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १४ :** मुलचेरा तालुक्यातील लगाम, कांक. रगड़ा, गिताली, शांतीग्राम, टिकेपल्ली, कोलपल्ली लगाम चेक, अहेरी तालुक्यातील बोरी परिसरात डेंग्युचा प्रादुर्भाव वाढून डेंग्युची लागण झाल्यानंतर नागपूर येथे उपचार घेत असतांना आष्टी येथील व्यवसायिकाचा डेंग्युने बळी गेला. यामुळे आरोग्य यंत्रणेत खळबळ निर्माण झाली आहे. नंदुपोल शेट्टीवार (५७) असे मृतकाचे नाव आहे.

आष्टी येथील रहिवासी व्यावसायिक नंदू पोलशेट्टीवार यांचे लगाम येथे बऱ्याच वर्षापासून किराणा दुकान आहे. लगाम परिसरात डेंग्यू चा प्रादुर्भाव जास्त असल्याने त्यांना डेंग्यू झाला होता. ते नागपूर येथे खाजगी दवाखान्यात उपचार घेतहोते. मात्र १३ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान आष्टी येथील ग्रामीण रूग्णालयात ५ डेंग्यु बाधीत रूग्णावर उपचार सुरू असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. डेंगुचा प्रादुभाव वाढत असल्याने नागरिकांत भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## १८ ला सर्चमध्ये फिजिओथेरपी ओपीडी

**गडचिरोलीः** सर्च संचालित माँ दंतेश्वरी हॉस्पिटलमध्ये १९ ऑगस्ट रोजी फिजिओथेरपीसाठी विशेष ओपीडीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये फिजिओथेरपिस्ट डॉ. श्रुती गोहाणे निदान आणि उपचार करतील. मान, पाठ आणि कंबर, गुडघे, घोटा यावर उपचार करण्यात येणार आहे.

## 'तिरंगा' मॅरेथॉनमध्ये धावली गडचिरोलीची तरूणाई

### नगर परिषद गडचिरोलीतर्फे आयोजन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १४ :** स्थानिक नगर परिषदेच्या वतीने 'हर घर तिरंगा २०२५' अंतर्गत इंदिरा गांधी चौक ते कृषी महाविद्यालय, सोनापूर, गडचिरोली या मार्गावर गुरूवार १४ ऑगस्ट रोजी तिरंगा दौड व मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या तिरंगा मॅरेथॉनमध्ये गडचिरोली शेकडो तरूणांनी दौड लावली.

कार्यक्रमास आमदार डॉ. मिलिंद नरोटे, मुख्याधिकारी सुर्यकांत पिदुरकर, जिल्हा क्रीडा अधिकारी भास्कर घटाळे, माजी नगरसेवक प्रमोद पिपरे यांच्यासह अनेक मान्यवर, नागरिक, युवक




आणि नगर परिषदचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील नागरिक, क्रीडा क्षेत्रातील खेळाडू, युवक-युवती, तसेच फिटनेस इन्फ्लुएंसर यांनी उत्साहाने सहभाग घेतला. दौड व मॅरेथॉनच्या माध्यमातून नागरिक. ांना राष्ट्रध्वजाचा सन्मान करण्याचे आणि एकतेचा संदेश देण्याचे आवाहन करण्यात आले. शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग लक्षणीय ठरला.

कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. महिला गटात प्रथम क्रमांक साक्षी पोलोजवार, द्वितीय श्रुती आदे तर तृतीय गायत्री धुरसे यांनी पटकावला. पुरुष गटात प्रथम क्रमांक अखिल जाधव, द्वितीय यश भाडेकर आणि तृतीय रोहन भुरसे यांनी मिळवला. दोन्ही गटांसाठी प्रथम क्रमांकाला रु. ५ हजार, द्वितीय क्रमांकाला ३ हजार आणि तृतीय क्रमांकाला २ हजार अशी रोख बक्षिसे देण्यात आली. बक्षीस वितरणाचा कार्यक्रम कृषी महाविद्यालय, सोनापूर परिसरात पार पडला. यावेळी नगर परिषदेच्या वतीने उपस्थितांना केळी, पाणी व बिस्कीटचे वाटप करण्यात आले.

महावितरण
## शुद्धिपत्रक

दि. 14/08/2025 रोजी प्रकाशित झालेल्या जाहिरात पी.आर.ओ. क्र. 75 मध्ये विभागाचे नाव व आस्थापना क्रमांक यामध्ये मुद्रणदोष आढळून आले आहेत. सुधारित तपशील असे वाचावे

| विभाग | आस्थापना क्रमांक |
|---|---|
| आलापल्ली विभाग | E-05202702239 |
| ब्रम्हपुरी विभाग | E-04172700056 |

अधिक्षक अभियंता
संवसु प्रविभाग, म.रा.वि.वि.कं.मर्या., गडचिरोली

**कार्यालय नगर पंचायत एटापल्ली**
**ता. एटापल्ली, जि. गडचिरोली**

क्रमांक/कली/नपए/३३६/२०२५
दिनांक : १४/०८/२०२५

**जाहीर ई-लिलाव सुचना (तिसरी वेळ)**

मुख्याधिकारी नगर पंचायत एटापल्ली, यांच्या सन २०२५-२६ या वर्षाकरिता आठवडी बाजार (बसका कर) वसुल करण्याबाबत जाहीर ई-लिलाव घेण्यात येत आहे. ई-लिलाव सुचना दि. १५/०८/२०२५ ते २१/०८/२०२५ पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यात उपलब्ध असेल.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगरपंचायत, एटापल्ली

**जाहीर नोटीस**

**विषयः मौजा महागाव बु. येथील स.नं. २१ (जुने स.नं. २२, २४) मधील कुळाची नोंद खारिज करण्याबाबत जाहीर प्रसिध्दी**


गडचिरोली जिल्हा, अहेरी तालुका येथील मौजा महागाव बु. तलाठी सर्कल नं. १० अंतर्गत असलेल्या स.नं. २१ (जुना स.नं. २२, २४), क्षेत्र ०.६६ हेक्टर, भोगवटदार वर्ग २ या जमिनीवर असलेल्या कुळाच्या नोंद. ामिध्ये 'गंगी ज. सोमा' यांचे नाव नोंद आहे. सदर नोंद खारिज करण्याबाबत श्री. नागेशराव नागा केदारी, रा. अहेरी, ता. अहेरी यांनी या कार्यालयास लेखी अर्ज दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी सादर केलेला आहे.

सदर प्रकरणामध्ये हरकत व स्पष्टीकरण मागवण्यासाठी दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी संबंधित नोटीस व जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आले होते. तथापि, विहित मुदतीत (१५ दिवसांत) कोणतीही हरकत किंवा आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

श्रीमती गंगी ज. सोमा यांच्यावर वैयक्तिकरित्या नोटीस तामील करण्यासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक व गावकऱ्यांकडून माहिती घेतली असता, त्या व्यक्तीचा गावाशी सध्या कोणताही संपर्क नाही व त्यांच्याबाबत कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नाही, असे कळले.

या पार्श्वभूमीवर, सदर प्रकरणाबाबत जाहीर प्रसिध्दी दिली जात आहे. तरीही जर कोणाला वरील भूमीसंदर्भात काही हरकत असल्यास त्यांनी या नोटीशीस प्रतिसाद द्यावा. अन्यथा, कोणाचीही हरकत नसल्याचे गृहित धरून श्रीमती गंगी ज. सोमा यांचे नाव अधिकार अभिलेखातून वगळण्याची कार्यवाही करण्यात येईल.

तहसीलदार, अहेरी




PNINO-MAHAMAR 2010585
महासागर गडचिरोली
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९९२२९७००३६/०७१३२२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)

गडचिरोली
# महासागर जिल्हा विशेष
शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५


## कुरखेडा येथील हनुमान मंदिरात सुंदरकांड पठण

**कुरखेडा :** सार्वजनिक श्री हनुमान मंदिर कुरखेडा येथे श्रावण मासानिमित्त मंगळवार १२ ऑगस्ट रोजी चिखली आणि चमू यांचा पंडित अविनाश दुबे महाराजांच्या संगतीने सुंदरकांड वाचन व भक्तिमय गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मंदिर कमिटीच्यावतीने या कार्यक्रमाला महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सुंदरकांड वाचनास दुबे महाराजांनी सुरुवात केली. कार्यक्रमाच्या शेवटी भगवान शंकराच्या आरतीने सांगता करण्यात आली. कार्यक्रमास मंदिर कमिटी सचिव श्याम लांजेवार, दिलीप कोणपत्तीवर महाराज, अशोक वैरागडे, उल्हास देशमुख, दुर्गेश देशमुख, राहुल गिरडकर, मंदिर कमिटी अध्यक्ष महेंद्रकुमार मोहबंसी, उपाध्यक्ष आशिष काळे, शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्रसिंह चंदेल, सार्वजनिक हनुमान मंदिर धार्मिक महिला अध्यक्ष शारदा गाथाडे, उपाध्यक्ष कविता खडसे, सचिव अश्विनी पिंपळकर, सहसचिव वनिता थोटे, कोषाध्यक्ष ज्योती उईके, सुधा नाकाडे, आशा बानबले, माया नैताम, वनिता लांजेवार, सुषमा उईके आदी उपस्थित होते.

# ‘खेड्याकडे चला’ शिबिरातून सर्चमध्ये १० हजार शस्त्रक्रिया

### जिल्ह्यातील गरजू आदिवासी व ग्रामीण भागातील रूग्णांना मिळाला दिलासा

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १४ :** डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग यांनी धानोरा तालुक्यातील चातगांव येथे स्थापन केलेली ‘सर्च’ ही संस्था गेल्या ४० वर्षांपासून आरोग्य क्षेत्रात महात्मा गांधींचे विचार प्रभावीपणे राबवण्याचा प्रयत्न करत आहे. ‘सर्च’ ने आयोजित केलेले शस्त्रक्रिया शिबिर हे गांधीजींच्या ‘गावाकडे चला’ या संदेशाचे प्रतिबिंब आहे. या मोहिमेत राज्य आणि देशाच्या विविध भागातील डॉक्टर गडचिरोली येथे येऊन आपली सेवा देतात. या शिबिरांच्या माध्यमातून आतापर्यंत १० हजार शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या आहेत. ज्यामुळे आदिवासी



आणि ग्रामीण रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गडचिरोली हा देशातील सर्वात दुर्गम जिल्ह्यांपैकी एक म्हणून ओळखला जातो. येथे आरोग्य सुविधा अजूनही मर्यादित आहेत. ‘सर्च’ ने विविध नावीन्यपूर्ण उपाययोजनांद्वारे या भागात आरोग्य सेवा पुरवण्याचे काम केले आहे. सर्चचे माँ दंतेश्वरी रुग्णालय १९९३ पासून कार्यरत आहे. त्याची रचना आणि कार्यपद्धती आदिवासी आणि ग्रामीण रुग्णांच्या गरजांना विशेष लक्ष देऊन तयार करण्यात आली आहे. सर्च येथे १९९६ मध्ये डॉ. शरद सालफळे यांनी पहिले हायड्रोसील शस्त्रक्रिया शिबिर आयोजित केले होते.

तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी येथे नियमित शस्त्रक्रिया शिबिरे सुरू करण्यात आली.

२०२४-२५ या वर्षातच ३० शस्त्रक्रिया शिबिरांच्या माध्यमातून १९५२ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. २०१९ मध्ये रुग्णालयाचा विस्तार करण्यात आला. ज्यामुळे आता मणक्याची शस्त्रक्रिया, प्लास्टिक सर्जरी, स्त्रीरोग आणि सामान्य शस्त्रक्रिया यासारख्या जटिल शस्त्रक्रिया देखील नियमितपणे केल्या जात आहेत. भारताच्या विविध भागातील १७ तज्ज्ञ डॉक्टर येथे निष्ठेने शस्त्रक्रिया करतात. ३ दशकांच्या या सेवेमुळे जिल्ह्यातील लोकांची सुमारे ३० कोटी रुपयांची बचत झाली आहे. रुग्णांसोबतच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना मोफत जेवण, एक्स-रे, लॅब चाचण्या आणि औषधे देखील दिली जातात.

### सर्च शोधग्राम आमच्यासाठी तीर्थक्षेत्रासारखेः डॉ. शिवडे

२००२ पासून येथे शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित करणारे लोणंद येथील सर्जन डॉ. संजय शिवडे म्हणतात, काळानुसार शस्त्रक्रियेत अनेक आधुनिक बदल झाले आहेत. येथील रुग्णांसाठी नेहमीच आधुनिक उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सर्च शोधग्राम आमच्यासाठी तीर्थक्षेत्रासारखे आहे.

# घरकुलाची कामे तत्काळ पूर्ण करा

### बीडीओ कस्तुरे यांच्या सूचनाः झिंगानुरात अर्धवट घरकुले

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १४ :** सिरोंचा पंचायत समितीचे संवर्ग विकास अधिकारी कस्तुरे यांनी झिंगानूर ग्रामपंचायतला भेट देऊन अर्धवट घरकूल कामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी लाभार्थ्यांना १५ दिवसांत घरकुलांचे काम पूर्ण करण्याच्या सूचना केल्या.

यावेळी जय बडे, संजय गुंप.ला, झिंगानूरच्या सरपंच नीलिमा मडावी, माजी ग्रा.पं. सदस्य तथा समाजसेवक रामचंद्र कुमरी, घरकूल लाभार्थी कैलास मडावी, लच्चा गावडे उपस्थित होते. बीडीओ कस्तुरे यांनी घरकुलाचे काम सुरू न केलेल्या व अर्धवट असलेल्या घरकूल लाभार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी अडचणींबाबत संवाद साधला. घरकुलाची कामे लवकर पूर्ण करण्याच्या सूचना केल्या. यावेळी लाभार्थ्यांनी सांगितले की, भरपावसाळ्यात रेती मिळत नाही. विटा नाही. त्यामुळे दिवाळीनंतर घरकुलाचे काम पूर्ण होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर बीडीओ कस्तुरे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिली. उपस्थित आरोग्य कर्मचाऱ्यांनी औषधसाठा, ओपीडीबद्दल माहिती दिली. दररोज ओपीडी सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत सुरू असते. सायंकाळी ४ ते ६ वाजेपर्यंत ओपीडी सुरू राहत असल्याचे सांगितले. यावेळी बीडीओंनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अंगणवाडी केंद्राला भेट देऊन पाहणी केली.



स्वातंत्र्याच्या ७९ व्या अमृत महोत्सवानिमित्त अहेरी येथील सीआरपीएफ ९ व ३७ बटालियनच्यावतीने ‘हर घर तिरंगा बॉईक रॅली काढण्यात आली. सदर रॅली नागेपल्ली, आलापल्ली, अहेरी मार्केट, अहेरी बस स्टॅंड मार्गक्रमण करण्यात आली. या रॅली सीआरपीएफचे अधिकारी, जवान आपल्या बाईकसह मोठ्या संख्येने सहिभागी झाले होते.

## महा अंनिसचा स्थापना दिन साजरा

**गडचिरोली :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा शाखा गडचिरोलीच्या वतीने ९ ऑगस्टला संघटनेचा ३६ वा स्थापना दिन व आदिवासी जागतिक दिन तसेच ऑगस्ट क्रांती दिन अंनिस कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाअंनिसचे जिल्हाध्यक्ष रोहिदास राऊत होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठल कोठारे, प्रा. मांतेश तोंडरे, जिल्हा प्रधान सचिव विलास पारखी उपस्थित होते. याप्रसंगी रोहिदास राऊत म्हणाले की, खरे पाहता समाजातील रूढ झालेल्या अंधश्रद्धांचे निवारण करून समाजाला डोळस बनविण्याचे काम हा शासकीय धोरणाचा भाग व्हायला पाहिजे. ही सरकारची जबाबदारी आहे. परंतु सरकार याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करते. तर हेच विधायक काम महाअंनिस मात्र आपले सामाजिक दायित्व समजून कोणत्याही मोलाची अपेक्षा न करता निःस्वार्थ भावनेने गाव, पाडे, शाळा, महाविद्यालयांमध्ये जाऊन करत असल्याचे सांगितले.

## ‘माहिती कोपरा’ ठरला शेतकऱ्यांसाठी ज्ञानाचा खजिना

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १४ :** महाविद्यालय सोनापूर गडचिरोली येथे सुरू असलेल्या ग्रामीण कृषी कार्यानुभव अंतर्गत विद्यार्थ्यांनी बोदली येथे ‘माहिती कोपरा’ सुरू करून शेतकऱ्यांना शेतीविषयक महत्त्वाची माहिती उपलब्ध करून दिली. या उपक्रमातून शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची, पिकांवरील रोग. नियंत्रणाची व शासकीय योजनांची माहिती एका ठिकाणी मिळावी या उद्देशातून ‘माहिती कोपरा’ची निर्मिती करण्यात आली.

या माहिती कोपऱ्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध कीड व रोगांची अचूक ओळख करून देण्यात आली. त्यावरील योग्य उपाययोजना, कीटकनाशके व बुरशीनाशके यांचा योग्य वापर, तसेच दुष्परिणाम कसे टाळावेत याचे मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय आधुनिक शेतीसाठी लागणारी उपकरणे, त्यांच्या वापराची पद्धत, पिकानुसार योग्य



बियाण्यांची निवड, बियाण्यांवरील टॅग्स व बियाणे प्रक्रिया यांची माहितीही देण्यात आली. यासोबतच माहिती कोपऱ्यातून कृषी विभागाकडून राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहितीही देण्यात आली. अनुदान, प्रशिक्षण शिबिरे व अर्ज प्रक्रिया यांची माहिती पोस्टर व चार्टच्या माध्यमातून देण्यात आली. रंगीत पोस्टर, माहितीपत्रके, नमुना बियाणे, कीटकांच्या प्रतिमा आणि उपकरणांची मॉडेल्स यामुळे हा कोपरा अधिक आकर्षक दिसत होता.

‘माहिती कोपरा’ शेतकऱ्यांना केवळ माहितीचे केंद्र ठरणार नाही तर आत्मनिर्भर व तांत्रिकदृष्ट्या सक्षम शेतीकडे नेणारे पाऊल ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या उपक्रमात तेजस आलाम, अस्मिता सराते, गायत्री नारनवरे, तृप्ती तेलामी, सानिका पेंदाम या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. हा उपक्रम महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. माया राऊत, कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रवीण महातळे, कार्यक्रम अधिकारी व विषयतज्ञ डॉ. रवींद्र करंगामी यांच्या मार्गदर्शनात पार पाडण्यात आला.

## सिरोंचातील प्रस्तावित सोलर प्रकल्प इतरत्र हलविण्यची मागणी



**तालुका प्रतिनिधी**
**सिरोंचा दि. १४ :** तालुक्यातील नगरपंचायत हद्दीत येणाऱ्या सर्वे क्र. ७१/२ या जागेवर शासनाद्वारे सोलर प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या ठिकाणी मागील ६० वर्षांपासून ५० पेक्षा अधिक कुटुंबे कायमस्वरूपी वास्तव्यास असून, काही नागरिक या जमिनीवर शेती करून उदरनिर्वाह करतात. त्यामुळे सिरोंचा येथील प्रस्तावित सोलर प्रकल्पामुळे पन्नासहून अधिक कुटुंबांचे अस्तित्व धोक्यात येणार असून सदर प्रकल्प इतरत्र हलविण्याची मागणी नागरिकांनी निवेदनातून शासनाकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, प्रस्तावित सोलर प्लांट उभारणीमुळे त्यांची घरे व शेती नष्ट होतील. यामुळे विस्थापनाचा धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तविली आहे. येथील बहुसंख्य नागरिक मजुरी व शेतीवर अवलंबून आहेत. त्यांच्या वास्तव्यासाठी पर्यायी जागा नसल्याने हा प्रकल्प त्यांच्या जगण्यावर थेट परिणाम करणार आहे. सोलर प्लांटसाठी इतर निर्जन व योग्य जागेची निवड करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून दिला आहे.

निवेदन देताना काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सतीश जवाजी, तालुका सचिव मुनाफ शेख, श्रीनिवास कोंडागोरला, अंकुदारी गट्टूमलू, पोचम दुर्गम, बनाया चंद्रगिरी, कोमली सुनातकरी, शंकर दुर्गम, रामूलू अरेल्ला यांच्यासह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

## खड्डेमय चेरपल्ली रस्त्याला ग्रामस्थांनी वाहिली श्रध्दांजली



**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि. १४ :** नगर पंचायत क्षेत्रातील विभाग क्रमांक १६ मधील चेरपल्ली या रस्त्याची मागील अनेक महिन्यांपासून दूरवस्था झाली आहे. मात्र, रस्ता दुरुस्तीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने गावकऱ्यांनी खराब रस्त्याला श्रद्धांजली वाहून आपला संताप व्यक्त केला आहे.

चेरपल्ली या रस्त्याची मागील अनेक महिन्यांपासून प्रचंड दूरवस्था झाली आहे. पावसामुळे यात आणखी भर पडली आहे. वारंवार मागणी करूनही संबंधित विभागाकडून रस्ता दुरुस्तीबाबत कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे शालेय विद्यार्थी आणि नागरिकांना अहेरी मुख्यालयापर्यंत पोहोचण्यासाठी आपला जीव धोक्यात घालावा लागत आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मनःस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी चक्क रस्त्यालाच श्रद्धांजली वाहली. ग्रामस्थांच्या या अनोख्या आंदोलनाची परिसरात चर्चा होत आहे. चेरपल्ली गावातील मुख्य रस्ता बऱ्याच काळापासून खराब स्थितीत आहे. ज्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. रस्त्याच्या खराब स्थितीमुळे वाहतुकीला त्रास होत असून, अपघातांचा धोका वाढला आहे. त्यामुळे नागरिकांनी छायाचित्र काढून रस्त्याला श्रद्धांजली वाहण्याचा एक अनोखा मार्ग अवलंबला.

## सायकल स्नेह मंडळातर्फे ‘तिरंगा सायकल यात्रा’

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १४ :** प्रदूषणमुक्त भारताचा संदेश आणि विद्यार्थ्यांमधील जनजागृतीचा हेतू घेऊन सायकल स्नेही मंडळ गडचिरोली यांच्या वतीने १२ ऑगस्ट रोजी भर पावसात ‘तिरंगा सायकल यात्रा’ आयोजित करण्यात आली होती. या यात्रेमुळे संपूर्ण शहर देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले. यात्रेचा शुभारंभ इंदिरा चौकातून नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी जयवंत काटकर यांच्या हस्ते झेंडी दाखवून करण्यात आला. भर पावसात निघालेली ही तिरंगा सायकल रॅली ठरविलेल्या मार्गानुसार इंदिरा चौक, पटेल सायकल स्टोअर्स, आठवडी बाजार, कारगिल चौक, विश्रामगृह, इंदिरा चौक येथून पार पडली.



समारोप कार्यक्रमास पोलिस निरीक्षक विनोद चव्हाण अध्यक्षस्थानी होते. त्यांनी तिरंगा सायकल रॅलीने शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण केले आहे. मी स्वतः दररोज सकाळी व रात्री शहरात सायकलवरून गस्त घालून कायदा व सुरक्षेची पाहणी करतो. भविष्यात प्रत्येक शाळेत वाहतूक नियम व शिस्तीबाबत जनजागृतीसाठी पोलिस विभाग पूर्ण सहकार्य करेल, असे आश्वस्त केले. यावेळी प्राचार्य योगेश पाटील उपस्थित होते.

यशस्वीतेसाठी सायकल स्नेही मंडळाचे अध्यक्ष प्रा. विलास पारखी, तिरंगा यात्रेचे आयोजक सचिव उदय धकाते, उपाध्यक्ष उपेंद्र रोहनकर, प्रा. सुनीता साळवे, सहसचिव योगिता दशमुखे, विजय साळवे, उपेंद्र रोहणकर, मुख्याध्यापिका सुचिता कामडी, मीरा बिसेनआर्ट ऑफ लिव्हिंगचे शिक्षक अमोल दशमुखे, बबलू शर्मा, सतीश धाईत, नगर परिषदेचे अभियंता अंकुश भालेराव आदी उपस्थित होते. या उपक्रमासाठी पोलिस विभाग आणि नगर परिषद गडचिरोली यांनी सहकार्य केले. संचालन व आभार विजय साळवे यांनी मानले.

या उपक्रमाचे मुख्य आयोजक मंडळाचे जिल्हा सचिव उदय धकाते होते. या उपक्रमात वसंत विद्यालय, महिला महाविद्यालय, विद्याभारती कन्या हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, फुले-आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, राणी दुर्गावती कन्या हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय अशा विविध शाळा-महाविद्यालयांतील सुमारे ३०० विद्यार्थी, शिक्षक-शिक्षिका तसेच नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

# शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ‘कॅरी फॉरवर्ड’ पध्दती लागू करा

### गोंडवाना विद्यापीठ प्रशासनाकडे सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांची मागणी

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १४ :** गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे हीत लक्षात घेऊन विद्यापीठ प्रशासनाने शैक्षणिक सत्र २०२३- २४ व २०२४-२५ मध्ये ‘कॅरी फॉरवर्ड’ पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची सवलत दिली होती. यामुळे चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांना त्याचा फायदा झाला होता. हीच पद्धती चालू शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी लागू करावी अशी मागणी सिनेट सदस्य तथा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांनी गोंडवाना विद्यापीठाकडे केली आहे.

विदर्भात येणाऱ्या अमरावती विद्यापीठाने ‘कॅरी फॉरवर्ड’ पद्धती लागू करून विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. यासोबतच गोवा विद्यापीठानेही लागू केल्याचे समजते. एकुणच राज्यातील काही विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांचे हीत लक्षात घेऊन कॅरी फॉरवर्ड पद्धती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यातच गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालय व त्या परिसराच्या भौगोलिक स्थितीचा विचार करता फार विदारक स्थिती आहे. यामुळे अनेक अडचणीचा सामना करून



जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना वरिष्ठ शिक्षण घ्यावे लागते. गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयात शिक्षण घेणारे अधिकाधिक विद्यार्थी ग्रामीण आदिवासी मागास दुर्गम डोंगराळ व नक्षल प्रभावित भागातील असून त्यांची कौटुंबिक आर्थिक सामाजिक अनेक अडचणी असल्याने त्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी आहे. यामुळे त्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान होत आहे. हे नुकसान टाळण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने तत्काळ ‘कॅरी फॉरवर्ड’ योजना लागू करावी, अशीही मागणी भाग्यश्री आत्राम यांनी केली आहे.

मागील काही वर्षापासून जिल्ह्यात विविध विद्यापीठाचे अभ्यासक्रम सुरू होत आहे. याचा परिणाम गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील प्रवेशावर होत असल्याचे दिसून येत आहे. कमी होणारी विद्यार्थी संख्या चिंतेची बाब ठरत आहे. राज्यातील काही विद्यापीठाने ही बाब लक्षात घेऊन ‘कॅरी फॉरवर्ड’ पद्धती सुरू केली आहे. या तुलनेत गडचिरोली जिल्ह्याची भौगोलिक स्थिती व येथील नागरिकांची आर्थिकस्थिती अतिशय बिकट आहे. ही बाब लक्षात घेऊन गोंडवाना विद्यापीठाने तत्काळ कॅरी फॉरवर्ड पद्धती लागू करावी, अशी मागणी सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांनी केली आहे.

## जेएसपीएम महाविद्यालयात ग्रंथपाल दिन साजरा

**धानोरा :** येथील श्री. जे.एस.पी.एम. महाविद्यालयात ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती ‘राष्ट्रीय ग्रंथपाल दिन’ म्हणून मंगळवार १२ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय थुल होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ प्रा. डॉ. राजू किरमिरे, डॉ. विना जंबेवार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. प्रवीण गोवणे यांनी तर आभार डॉ. प्रियंका पठाडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी छाया चंदेल, भास्कर वाढणकर यांनी सहकार्य केले.

### जाहीरनामा

श्री. गणपती रामय्या कांबळे मौजा. छल्लेवाडा, ता. अहेरी जिल्हा गडचिरोली येथे जन्म दि. ०१/०१/१९६९ रोजी झाला असुन त्यांचे जन्म नोंद रेकार्ड वर नाव उपलब्ध नसल्याने त्यांनी जाहिरनामा प्रसिद्ध करण्याबाबत तहसिलदार साहेब अहेरी यांचाकडे अर्ज सादर केले असुन कोणाचे आक्षेप असल्यास १५ दिवसाच्या आत ग्राम पंचायत रेपनपल्ली किंवा कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अहेरी येथे नोंदवावे.

### जाहीरनामा

श्री. विश्वनाथ यमाजी झाडे मौजा. छल्लेवाडा, ता. अहेरी जिल्हा गडचिरोली येथे जन्म दि. ११/०१/१९८४ रोजी झाला असुन त्यांचे जन्म नोंद रेकार्ड वर नाव उपलब्ध नसल्याने त्यांनी जाहिरनामा प्रसिद्ध करण्याबाबत तहसिलदार साहेब अहेरी यांचाकडे अर्ज सादर केले असुन कोणाचे आक्षेप असल्यास १५ दिवसाच्या आत ग्राम पंचायत रेपनपल्ली किंवा कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अहेरी येथे नोंदवावे.

### जाहीरनामा

श्री. बाजीराव मंगा सिडाम मौजा. रेपनपल्ली ता. अहेरी जिल्हा गडचिरोली येथे जन्म दि. ०१/०७/१९६५ रोजी झाला असुन त्यांचे जन्म नोंद रेकार्ड वर नाव उपलब्ध नसल्याने त्यांनी जाहिरनामा प्रसिद्ध करण्याबाबत तहसिलदार साहेब अहेरी यांचाकडे अर्ज सादर केले असुन कोणाचे आक्षेप असल्यास १५ दिवसाच्या आत ग्राम पंचायत रेपनपल्ली किंवा कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अहेरी येथे नोंदवावे.

### जाहीरनामा

कु. मणूषा किसन अजमेरा मौजा. छल्लेवाडा, ता. अहेरी जिल्हा गडचिरोली येथे जन्म दि. ०४/१२/१९९९ रोजी झाला असुन त्यांचे जन्म नोंद रेकार्ड वर नाव उपलब्ध नसल्याने त्यांनी जाहिरनामा प्रसिद्ध करण्याबाबत तहसिलदार साहेब अहेरी यांचाकडे अर्ज सादर केले असुन कोणाचे आक्षेप असल्यास १५ दिवसाच्या आत ग्राम पंचायत रेपनपल्ली किंवा कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अहेरी येथे नोंदवावे.

